


दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता


vadalvartanews@gmail.com




●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● बुधवार २८ ऑगस्ट २०२४ ● आरएनआय-एमएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक १३ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# भाजपाच्या माजी नेत्याची मोठी खेळी,अटल बिहारी वाजपेयींच्या नावाने बनवणार नवा पक्ष



यंदाच्या लोकसभा निवडणुकीत बहुमत हुकल्यानंतर भाजपासमोरील समस्या सातत्याने वाढत आहेत. त्यातच काही महिन्यांवर आलेल्या झारखंडमधील विधानसभा निवडणुकीमुळे या राज्यातील राजकीय हालचालींना वेग आला आहे. एकीकडे झारखंड मुक्ती मोर्चाचे नेते चंपाई सोरेन यांनी भाजपामध्ये प्रवेश केल्याने राज्यातील समिकरणं बदलली आहेत. तर दुसरीकडे भाजपाच्या एका बड्या माजी नेत्याने माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या नावाने नव्या पक्षाची स्थापना करण्याचे संकेत देत भाजपाचं टेन्शन वाढवलं आहे. भाजपाचे एकेकाळचे वरिष्ठ नेते असलेले माजी केंद्रीय मंत्री यशवंत सिन्हा यांनी झारखंड विधानसभा निवडणुकीच्या माध्यमातून राजकारणाच्या मुख्य प्रवाहात परतण्याची तयारी करत आहेत. तसेच यशवंत सिन्हा हे त्यांचा स्वत:चा पक्ष स्थापन करणार असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे. यशवंत सिन्हा यांच्या नेतृत्वाखाली पक्ष स्थापन करण्याचा निर्णय हा हजारीबार येथे झालेल्या अटल विचार मंचच्या बैठकीमध्ये घेण्यात आला. हजारीबाग येथे अटल विचार मंचची बैठक नुकतीच झाली. प्राध्यापक सुरेंद्र सिन्हा यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या बैठकीमध्ये वाजपेयी सरकारमध्ये परराष्ट्र आणि वित्त मंत्रालय सांभाळणारे यशवंत सिन्हा हेही उपस्थित होते. अटल विचार मंचच्या बैठकीमध्ये झारखंडमधील सध्याच्या राजकीय परिस्थितीतीबाबत चर्चा करण्यात आली. त्यानंतर नव्या राजकीय पक्षाच्या स्थापनेचा प्रस्ताव संमत करण्यात आला. यशवंत सिन्हा यांच्या नेतृत्वाखाली स्थापन होणाऱ्या या पक्षाचं नाव माजी पंतप्रधान अटल बिहारी यांच्या नावावर असेल. यशवंत सिन्हा म्हणाले की, आजचं राजकारण हे चाटुकारितेचं राजकारण बनलं आहे. भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या विचारांवर वाटचाल करून स्वच्छ चारित्र्याचं राजकारण करून समाजातील प्रत्येक वर्गाचा उत्कर्ष करया येऊ शकतो. त्यांच्या विचारांवर चालण्याची आवश्यकता आहे. यशवंत सिन्हा यांच्या नेतृत्वाखाली पक्षाची स्थापना कधी होणार, याबाबत कुठलीही माहिती समोर आलेली नाही. यशवंत सिन्हा यांनी जनता दल पक्षातून आपल्या राजकारणाची सुरुवात केली होती. त्यानंतर ते भाजपामध्ये आले. नंतर ते ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसमध्ये होते. २०२२ मध्ये त्यांनी विरोधी पक्षांकडून राष्ट्रपतीपदाचे उमेदवार म्हणून निवडणूक लढवली होती.



## वंजारी महासंघाकडून ज्ञानेश्वर बुधवत यांना राष्ट्रसंत भगवान बाबा समाज प्रबोधन महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान

**सिंदखेड राजा । प्रतिनिधी**

वंजारी महासंघाचे दुसरे राज्यस्तरीय साहित्य संमेलन दिनांक २५ ऑगस्ट रोजी गंगा लॉन्स राष्ट्रसंत भगवानबाबा चौक निर्मल नगर अहमदनगर येथे नुकतेच उत्साहात संप्पन्न झाले.या संमेलनासाठी संमेलनाध्यक्ष म्हणून प्रा.डॉ. सांगिता घुगे तर उद्घाटक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. गजानन सानप हे उपस्थित होते. वंजारी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष विचारवंत गणेशजी खाडे,स्वागताध्यक्ष म्हणून आंतरराष्ट्रीय कुस्ती पटू राजकुमार आघाव तर सहस्वागताध्यक्ष रेणुका वराडे अनेक दिग्गज मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला.या संमेलनात दैनिक लोकनेताचे संपादक, ज्ञानेश्वर बुधवत यांना राष्ट्रसंत भगवान बाबा साहित्यरत्न पुरस्कार २०२४ प्रदान करण्यात आला.

ज्ञानेश्वर बुधवत मातृतीर्थ सिंदखेडराजा तालुक्यातील सावखेड तेजन या खेडे गावातले असून ज्ञानेश्वर बुधवत यांच्या निर्भिड व नि:पक्षपाती पत्रकारिता या सर्व कामाची दखल घेऊन वंजारी महासंघ महाराष्ट्र यांच्या मार्फत ' राष्ट्रसंत भगवान बाबा साहित्यरत्न पुरस्कार २०२४ ' लेखक, संपादक ज्ञानेश्वर बुधवत यांना नुकताच प्रदान करण्यात आला. या पुरस्कारामुळे ज्ञानेश्वर बुधवत यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# चिंचोलीमाळी येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी सोहळा व दहीहंडी

**केज । सचिन भालेराव**

तालुक्यातील चिंचोलीमाळी येथे भाजपाचे जेष्ठ नेते सुनीलआबा गलांडेपाटील यांनी उभारलेल्या श्रीकृष्ण मंदीरात सोमवारी श्रीकृष्ण जन्माष्टमी निमीत्त,गीता पठण,सांस्कृतिक कार्यक्रम, व हरिकीर्तनाचा कार्यक्रम तर मंगळवारी सकाळी पालखी मीरवणुक व त्यानंतर श्रीकृष्ण मंदीरा समोर दहीहंडीचा कार्यक्रम झाला.... श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त सोमवारी सकाळी ८ ते १० दरम्यान श्रीकृष्ण मंदीरात विश्वांबर आप्पा शिरूरकर यांचे गीता पठण,रात्री ७ ते १० कर्मवीर विद्यालयातील विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम व रात्री हभप प्रमोद महाराज



पवार यांचे हरीकिर्तन व रात्री १२ वाजता श्रीकृष्ण जन्मानंर सर्व भाविकांना महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. मंगळवारी सकाळी ११ वाजता श्रीकृष्ण मंदीरापासुन ,श्रीकृष्ण नगर परीसरात पालखी मीरवणुक काढण्यात आली.व दुपारी १२ वाजता श्रीकृष्ण मंदीरासमोर दहीहंडीचा कार्यक्रम झाला. व त्यानंतर भाविकांना महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. भाजपचे जेष्ठ नेते आणि श्रीकृष्ण मंदीराचे संस्थापक सुनीलआबा गलांडेपाटील यांनी आयोजित केलेल्या या सोहळ्यास भाजपचे जेष्ठ नेते नंदकिशोर काकाजी मुंदडा, भाजपा डॉ आघाडी चे जिल्हाध्यक्ष डॉ वासुदेव नेहरकर,जि.प.सदस्य विजयकांत मुंडे,डोक्याचे सरपंच गोरख भांगे,केवडचे चेअरमन गणेश सपाटे,चेअरमन अरुण काळे,चेअरमन बालाप्रसाद भुतडा ,व अन्य नेते मंडळी तसेच राम मेजर राऊत, मनोज गालफाडे, विठ्ठल झाडे, वसंत काळे शिक्षक पतसंस्थेचे सचिव संजय गलांडेसर, दगडु दळवे,दीलीप गायकवाड,नरायणमहाराज भिसे, आश्रुबा वायबसे , ग्रामपंचायत सदस्य संजय महाराज नखाते , वि रविंद्र गलांडे,अजय काळे,ग्रामपंचायत सदस्य सुरज गायकवाड, माणिक गालफाडे , आबा महाराज मेहरकर, यांचेसह पंचक्रोशीतील भावीक मोठ्या संख्येने हजर होते.

## नशा मुक्त भारत अभियान अंतर्गत फोडली व्यसनमुक्तीची दहीहंडी

बीड । प्रतिनिधी समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद बीड नशाबंदी मंडळ बीड व राजर्षी छत्रपती शाहू महाराज प्रतिष्ठान बीड यांच्या संयुक्त विद्यमाने व्यसनमुक्तीची दहीहंडी फोडण्याचा कार्यक्रम आज घेण्यात आला भारतीय संस्कृतीमध्ये विविध समारंभ खूप मोठ्या उत्साहात साजरी केले जातात परंतु या उत्साहातून व्यसनाची सवय लागू नये याकरिता मी युवकांनी किशोर विन बालकांनी सजग राहणे गरजेचे आहे तंबाखू, दारू,मावा, खर्रा , सिगारेट, ड्रग्स याची सवय लागू नये व ज्यांना सवय जडली आहे त्यांना यापासून मुक्ती मिळावी यासाठी तरुण युवकांनी एकत्र येऊन व्यसनमुक्तीची दहीहंडी फोडली प्रत्येकाने व्यसनमुक्त राहणे गरजेचे आहे असा संदेश या व्यसनमुक्ती दहीहंडीच्या माध्यमातून देण्यात आला यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. दत्ताजी नलावडे, अशोक तांगडे ,मिथुन जोगदंड, तत्वशील कांबळे ,ज्योती गायकवाड ,गजानन जानोळे आधी उपस्थित होते यावेळी बोलताना अशोक तांगडे म्हणाले की व्यसनामुळे संपूर्ण कुटुंबाचा ऱ्हास होतो व्यसनामुळे विविध आजार जडले जातात व्यसन लागल्यानंतर सुटण्यासाठी खूप मोठ्या प्रमाणात प्रयत्न करावे लागतात परंतु व्यसन लागूच नाही यासाठी प्रयत्न करणे खूप गरजेचे आहे त्यामुळे कोणत्याही युवकांनी व्यसन लागू नये यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन यावेळी उपस्थित सर्व विध्यार्थी याना करण्यात आले. या दहीहंडीचा मुख्य उद्देश कोणत्याही युवकाने कोणतीही नशा करू नये हा होता असे आयोजक तत्त्वशील कांबळे यांनी यावेळी सांगितले.

# राष्ट्रसंत भगवानबाबा समाज प्रबोधन महाराष्ट्र भुषण पुरस्काराने संपादक बालासाहेब फड

**परळी । प्रतिनिधी**

अहमदनगर येथे वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्य साहित्य आघाडी च्या वतीने जगत् विख्यात तत्वज्ञानी थोर समाजसुधारक प्रबोधनकार राष्ट्रसंत भगवानबाबा समाज प्रबोधन महाराष्ट्र भुषण पुरस्कार सोहळ्यात वितरण वार रविवार रोजी गंगा लान्स राष्ट्रसंत भगवानबाबा चौक निर्मल नगर अहमदनगर येथे शानदार सोहळ्यात संपन्न झाला.

समारंभ प्रसंगी सकाळी 100 ढोल ताशांच्या गजरात पाहुणे भगवान बाबा चौक येथुन ग्रंथ दिंडीत स्वागत करून पाहुणे यांना कार्यक्रम स्थळी आणण्यात आले.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून अहमदनगर विधान सभा मतदार संघाचे आमदार संग्राम भैया जगताप, शिवाजीराव कर्डिले चेअरमन जिल्हा मध्यवर्ती बँक अहमदनगर ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ पिठाचे



राज्यपाल नियुक्त आधि सभा सदस्य डॉ. गजानन घुगे, संमेलनाध्यक्ष अध्यक्ष कवयित्री संगीता घुगे ,साहित्यिक तथा आयोजक गणेश खाडे, प्रा वा .ना. आंधळे, विश्वविजेते कुस्ती खेळाडू राजकुमार आघाव, राज्यपाल नियुक्त अधिसभा सदस्य प्राचार्य नवनाथ आघाव, डॉ. नियुक्त आधीसभा सदस्य ॲड अरविंद केंद्रे, ह भ प डॉक्टर सविता ताई खेडकर ,युवा नेते अक्षय कर्डिले ,घनश्याम बोडके, लक्ष्मराज सानप, बुद्धाची पानसरे दादा आदींसह वंजारी समाजबांधव , महिला व सामाजिक राजकीय, साहित्यिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित संपन्न झाला .

# एसटी बससाठी विद्यार्थ्यांचे मांजरसुंभा बस स्थानकात ठिय्या आंदोलन!

## एसटी महामंडळाचा गलथान कारभार व हलगर्जीपणामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक आणि आर्थिक नुकसान

बीड । प्रतिनिधी

मागील तीन दिवसापासून मांजरसुंबा बस स्थानकातून एसटी बस येत नसल्यामुळे मांजरसुबा येथील शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शाळा कॉलेजात उपस्थित राहता आले नाही. विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक आणि आर्थिक ही नुकसान होत आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापक आणि शिक्षकवृंदांना सोबत घेऊन मांजरसुंबा बस स्थानकात ठिय्या आंदोलन केले. विद्यार्थ्यांनी मांजरसुंबा बस स्थानकात ठिय्या आंदोलन करताच एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी ताबडतोब एसटी बस उपलब्ध करून दिली. त्यानंतर विद्यार्थी आपापल्या घरी सुरक्षितरीत्या पोहोचले. यापुढे विद्यार्थ्यांना शाळा महाविद्यालयात येण्यासाठी एसटी बस उपलब्ध न झाल्यास शिक्षक मुख्याध्यापक यांच्यासह विद्यार्थी विद्यार्थिनी रास्ता रोको आंदोलन करणार असल्याचा इशारा बीड जिल्हा मुख्याध्यापक संघाचे जिल्हा सचिव तथा शिक्षक सेना बीड जिल्हाध्यक्ष प्राचार्य विष्णुपंत रसाळ पाटील यांनी एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे.

बीड एसटी महामंडळाच्या गलथान कारभारामुळे व हलगर्जीपणामुळे मांजरसुंबा बस स्थानकामध्ये मागील तीन दिवसापासून एसटी बस येत नसल्यामुळे शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शाळा महाविद्यालयात उपस्थित राहता आले नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान होत आहे. मांजरसुंबा येथील डॉक्टर पारनेरकर महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मध्ये 140 मुली व 90 मुले नियमित पासधारक आहेत. ते धनगरवाडी, कपिलधारवाडी, कोळवाडी, गवारी व उदंड वडगाव या ठिकाणाहून शाळेला एसटी बसने ये जा करत आहेत. परंतु मागील तीन दिवसापासून एसटी बस न आल्यामुळे त्यांना शाळेत येण्या-जाण्यास अडचणीचा सामना करावा




लागत आहे. तसेच त्यांचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान होत आहे. त्यामुळे आज मंगळवार दिनांक 27 रोजी विद्यार्थी विद्यार्थिनीनी शिक्षक व कर्मचा-यांनी एसटी बससाठी मांजरसुंबा बस स्थानकात ठिय्या आंदोलन केले. विद्यार्थ्यांनी ठिय्या आंदोलन केल्यानंतर परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी बस उपलब्ध करून दिली. त्या नंतर विद्यार्थी सुरक्षितरित्या आपापल्या गावी घरी परत गेले. एसटी महामंडळ राजकीय पक्षांच्या सभा व मेळाव्यासाठी बीड येथून एसटी बस बाहेरगावी पाठवत आहेत. त्यामुळे विद्यार्थी व नागरिकांची प्रचंड हेळसांड होत आहे. ही अत्यंत दुर्दैवी व खेदाची बाब आहे. यानंतर एसटी बस वेळेवर व नियमित न आल्यास मांजरसुंबा चौकात विद्यार्थी,पालक, शिक्षक कर्मचारी व मुख्याध्यापकांच्या मार्फत रास्ता रोको करण्यात येईल आणि एसटी महामंडळाच्या सर्व आगाराच्या बस अडवण्यात येतील असा इशारा बीड जिल्हा मुख्याध्यापक संघाचे जिल्हा सचिव तथा शिक्षक सेना बीड जिल्हाध्यक्ष प्राचार्य विष्णुपंत रसाळ पाटील यांनी आगार प्रमुख एसटी आगार बीड व विभाग नियंत्रक रा. प . म . बीड यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे. या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार, परिवहन मंत्री, शिक्षण मंत्री दीपक केसरकर महाराष्ट्र यांना पाठवण्यात आल्या.

# राजकोट येथील पुतळा प्रकरणी सबंधित भ्रष्ट अधिकाऱ्यावर गुन्हे दाखल करा : केज तालुका कॉंग्रेस (आय) ची मागणी

केज । सचिन भालेराव

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील राजकोट येथे नव्याने उभारलेला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्या प्रकरणी राज्य सरकारचा निषेध नोंदवून या निकृष्ट कामाला जबाबदार असलेले सबंधित भ्रष्ट अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केज तालुका कॉंग्रेस (आय) पक्षाचे तालुका अध्यक्ष प्रवीण खोडसे यांनी केली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील राजकोट येथे सरकारने कोट्यावधी रू. खरच करून स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारला होता. या पुतळ्याचे अनावरण हे देशाचे पंतप्रधान नरेंद्र




मोदी यांच्या हस्ते झाले होते. परंतु केवळ आठ महिन्या पूर्वी उभारलेला हा पुतळा कोसळला आहे. या अत्यंत दुर्दैवी आणि देशाला लांच्छनास्पद घटनेचा केज तालुका कॉंग्रेस (आय) पक्षाचे तालुका अध्यक्ष प्रवीण खोडसे यांनी तहसीलदारांना निवेदन देत भ्रष्ट सरकारचा निषेध व्यक्त करून केला आहे. या प्रकरणाला जबाबदार असलेले सबंधित भ्रष्ट अधिकारी यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची मागणी निवेदनात केली आहे. निवेदनावर तालुका अध्यक्ष प्रवीण खोडसे यांच्यासह विशाल मुळे, महादेव खोडसे, नारायण काकडे, ज्योतीराम माने यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# गणेशोत्सवाच्या वर्गणी वरुन खंडणीचा गुन्हा दाखल

केज । गौतम बचुटे केज शहरात गणेशोत्सवाच्या वर्गणी वरून दोघा विरुद्ध पोलिसांत खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या बाबतची माहिती अशी की, केज येथील भवानी माळ येथे राहत असलेल्या भागीरथी भारत राऊत या ७० वर्षाच्या वृद्धेच्या ओळखीचे जनक शिनगारे व सुमित शिनगारे हे दोघे घरा समोर आले. ते भागीरथी राऊत यांना म्हणाले की तुमच्या सुनेने काल रात्री गणपतीची ५०० रु. वर्गणी मागीतली होती. ती तुम्ही का दिली नाही ? आज जर तुम्ही आम्हाला ५०० रुपये वर्गणी दिली नाही; तर तुम्हा सर्वांना मारुन टाकु. अशी धमकी देवुन शिवीगाळ केली. तेव्हा भागीरथी राऊत यांनी त्यांना १०० रु. दिले. परंतु ते म्हणाले की १०० नाही; तर ५०० रु. गणपतीची वर्गणी द्यावी लागेल. त्यावर त्या त्यांना म्हणाल्या की, त्यांच्याकडे एवढे पैसे नाहीत. असे म्हणताच पुन्हा त्यांनी शिवीगाळ केली. तेवढ्यात त्यांची सुन गंगा महादेव राऊत व मुलगा महादेव हे तेथे आले असता त्यांना पण मारहाण केली आणि बाजुला असलेल्या फळीने भागीरथी राऊत यांच्या डाव्या हाताचे मनगटावर मारहाण दुखापत करून खाली पाडुन लाथाबुक्याने मारहाण केली. या प्रकरणी भागीरथी राऊत यांच्या तक्रारी वरून जनक शिनगारे आणि सुमित शिनगारे या दोघा विरुद्ध के ज पोलीस ठाण्यात गु. र. नं. ४६०/२०२४ भा. न्या. सं. ११५(२), ११८(१), ३(५), ३०८(२), ३५१(२),३५१(३), ३५२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा कोसळल्याच्या दुर्दैवी घटनेचा आम आदमी पार्टी च्या वतीने जाहीर निषेध

**छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे लोकार्पण करण्याचे श्रेय माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतले, ढासळल्याची पण घ्यावी माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी**




बीड:आम आदमी पार्टी बीड जिल्ह्याच्या वतीने नोंदवण्यात येत आहे की महाराष्ट्राचे कुलदैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा कोसळला या दुर्दैवी घटनेचा निषेध नोंदवत आहे कारण ज्या महाराष्ट्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराज हे कुलदैवत मानले जाते त्या महाराजांचा फक्त आठ महिन्याच्या कालावधीमध्ये कोसळतो आणि तोही देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हातसे त्याचे लोकार्पण होते आणि तो पुतळा फक्त आठ महिन्यांमध्ये कोसळतो या पेक्षा मोठा दुर्दैव या देशांमध्ये होऊ शकत नाही तर माननीय पंतप्रधान यांनी लोकार्पण करण्याची वा वाई घेतली तर आता पुतळा ढासळला याची देखील जिम्मेदारी घ्यावी या भयानक गोष्टीची कसून चौकशी झाली पाहिजे आणि या देशांमध्ये किती खालच्या दर्जापर्यंत निकृष्ट काम करण्याची वृत्ती आणि भ्रष्टाचाराचे मूळ पोहोचले आहेत हे कळत आहे यामध्ये दोषी असणारे नेते असतील गुत्तेदार असतील अधिकारी असतील आणि ज्या लोकांनी या पुतळ्याचे लोका अर्पणाचे श्रीय घेतले असेल त्या जिम्मेदार लोकांनी देखील या निकृष्ट दर्जाच्या पुतळा निर्मितीची जबाबदारी घ्यावी आणि देशातील नागरिकांची व छत्रपती शिवाजी महाराजांची नाक रगडुन माफी मागावी या गोष्टीचा जाहीर निषेध आम आदमी पार्टी कडून जिल्हा अधिकाऱ्यांच्या मार्फत नोंदविण्यात आला आहे यावेळी आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष माजी सैनिक अशोक येडे, शहर प्रमुख सय्यद सादेक, तालुका उपाध्यक्ष आजम खान, तालुका संघटन मंत्री दत्ता सुरवसे, अल्पसंख्याक विभाग प्रमुख पठाण, प्रमुख रामभाऊ शेरकर, युवा नेते प्रवीण आणेराव ,श्री सोनवणे व सौ सोनवणे मॅडम इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते

# सन २०२२ पासून बेपत्ता असलेल्या मुलीचा व आरोपीचा ए.एच.टी.यू. कडे तपास आल्यानंतर अवघ्या ६ दिवसात शोध

संतोष औताडे- अहमदनगर प्रतिनिधी दि.२६/०८/२०२४ प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, संगमनेर तालुका पो.स्टे. गुन्हा रजि. नं. । ३९२/२०२२ भादवि कलम ३६३, ३७० प्रमाणे दि. १५/०९/२०२२ रोजी दाखल होता. सदर गुन्ह्यात यातील अल्पवयीन मुलीस आरोपी नामे सौरभ अरविंद ठाकूर वय २५ वर्षे रा. चौदा निलेश भाई की चाल दाभेल दमण बलसाड दमण डीडी ३९६२१० सर्कल गुजरात मूळ रा. आलनपुर पो.स्टे. चौका जि. सागर मध्यप्रदेश याने फूस लावून पळवून नेले होते. सदर गुन्ह्याचा पो.स्टे स्तरावर तपास न लागल्याने दि. १९/०८/२०२४ रोजी पुढील तपास कामी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष अहमदनगर येथे वर्ग करण्यात आलेला होता.




सदर गुन्ह्याचा तपास पोसई बाळासाहेब शिंदे हे करीत होते. सदर गुन्ह्यातील अपहरीत मुलगी व आरोपी यांचा शोध घेत असताना व गुप्त बातमीदारामार्फत माहिती घेवून पाठपुरावा करत असताना यातील आरोपी व अपहरीत मुलगी असे बोल्हेगाव, अहमदनगर येथे आल्याची माहिती मिळाल्याने पोसई बाळासाहेब शिंदे हे स्टापसह बोल्हेगाव, अहमदनगर येथे जावून तेथून अपहरीत मुलगी, आरोपी व त्यांचा १ वर्षाचा मुलगा यांना ताब्यात घेवून सदर गुन्ह्याचे तपासाचे मूळ कागदपत्र, केसडायरीसह अपहरीत मुलगी व आरोपी असे संगमनेर तालुका पोलीस स्टेशनला पुढील तपासकामी हजर करण्यात आलेले आहे.

सदरची कारवाई मा. श्री राकेश ओला, पोलीस अधिक्षक, अहमदनगर, श्री प्रशांत खैरे, अपर पोलीस अधिक्षक अहमदनगर, श्री अमोल भारती पोलीस उपअधिक्षक, नगर शहर विभाग, चार्ज आर्थिक गुन्हे शाखा, अहमदनगर, श्री. राजेंद्र इंगळे, नेम. ए. एच.टी.यू. अहमदनगर यांचे सूचना व मार्गदर्शनाखाली पोसई / बाळासाहेब शिंदे, पोहेकॉ / २०२४ समीर सय्यद, मपोहेकॉ १२४६ / अर्चना काळे, मपोहेकॉं / १०८२ अनिता पवार, मपोकॉं/१३६५ छाया रांधवन, चापोकॉं / २६७३ काळे सर्व नेम- अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष (AHTU) अहमदनगर यांनी केली आहे.

# भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या शास्त्रज्ञांची कृषी विज्ञान केंद्राला आढावा

**नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट**

नांदेड : भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली मार्फत भारतातील ७३१ कृषी विज्ञान केंद्राचा आढावा घेतला जात आहे त्याचा अनुषंगाने भारतीय कृषी अनुसंधान परिषद नवी दिल्ली संचलित कांदा व लसूण संशोधन संचनालय, राजगुरू नगर ,पुणे येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. राजीव काळे यांनी नुकतीच कृषी विज्ञान केंद्र पोखरणीला भेट दिली. कार्यक्रमाची सुरुवात भारतीय कृषी अनुसंधान परिषद गीतांनी करण्यात आली त्यानंतर उपस्थित मान्यवर व प्रगतशिल शेतकरी बांधवांचा शॉल, पुष्पगुच्छ ,श्रीफळ व व.ना.म. कृषी विद्यापीठ,परभणी दैनंदिनी देऊन सत्कार करण्यात आला. तदनंतर कृषी विज्ञान केंद्र ,पोखरणी नांदेडचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ.देविकांत देशमुख यांनी उपस्थित मान्यवर व जिल्ह्यातील निवडक प्रयोगशील व प्रगतशील शेतकरी बांधव यांच्या पुढे कृषी विज्ञान केंद्राच्या मागील तीन वर्षाचा विविध कृषी विस्तार कार्यक्रम , शेतकरी कल्याण कार्यक्रम आणि उपक्रमाचे सादरीकरण केले. डॉ.राजीव काळे सरांनी सादरीकरण नंतर जिल्ह्यातील निवडक प्रयोगशील व प्रगतीशील शेतकरी बांधवांशी प्रत्यक्ष संवाद साधला, आणि कृषी विज्ञान केंद्र व त्यांचे विविध कार्यक्रम प्रशिक्षणे, प्रात्यक्षिके संवाद याविषयी सविस्तर माहिती शेतकऱ्याकडून ऐकली व कृषी विज्ञान केंद्र जिल्ह्यात राबवित असलेल्या विविध उपक्रमाचे कौतुक केले. डॉ.राजीव काळे सरांनी कृषी विज्ञान केंद्राच्या विविध डेमो




युनिट जसे की एकात्मिक शेती मॉडेल शेडनेट हाऊस, पॉलिहाऊस लागवड ,प्रकल्प जैविक व सेंद्रिय औषधी प्रकल्प ,सेंद्रिय परसबाग, हळद , सोयाबीन कापूस, मूग, तुर, भरडधान्य पिके आणि पिकांचे विविध वाण , पपनस फळ, करवंद लागवड, दहा ड्रम युनिट, अझोला युनिट, हायड्रोपोनिकस युनिट ना भेट दिली. त्यानंतर मालेगाव येथील कृषी विज्ञान केंद्राच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत शेतकरी उत्पादक कंपनी ,शेतकरी गट व सेंद्रिय आणि नैसर्गिक शेती करणाऱ्या शेतकरी बांधवांच्या थेट बांधावर जाऊन संवाद साधला.मागील तीन वर्षात व सद्य परिस्थितीत कृषी विज्ञान केंद्राने राबविलेल्या विविध योजना प्रथमदर्शनी पीक प्रात्यक्षिके, शेतावरील चाचण्या, विविध प्रशिक्षणे, शेतकरी व शास्त्रज्ञ संवाद कृषी विज्ञान केंद्राचा विविध संलग्नित विभाग जसे की कृषी विभाग,आत्मा, फलोद्यान रेशीम, पशुसंवर्धन ,महिला व बालविकास, ग्राम उद्योग ,जिल्हा उद्योग केंद्र ,बँका व इतर संशोधन संस्था यांच्याशी असलेला समन्वय व कार्य प्रणाली याविषयी सविस्तर माहिती जाणून घेतली तसेच कृषी विज्ञान केंद्र वेळोवेळी शेतकऱ्यांना करीत असलेली मदत तसेच दर्जेदार निविष्ठांचा वापर व त्याद्वारे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात आणि जीवनमानात झालेली सुधारणा याविषयी समाधान व्यक्त केले. यावेळी कोषाध्यक्ष सौ.शोभाताई विठ्ठलराव जाधव,कृषी विज्ञान केंद्राचे संचालक डॉ.एस डी मोरे, प्रा. माणिक कल्याणकर , डॉ.महेश अंभोरे, प्रा. संदीप जायभाये ,प्रा. अलका पवळे ,राजीव इंगोले ,राकेश वाडीले ,अशोक भालेराव, प्राजक्ता हाडोळतीकर, सतिश जाधव, सुदाम गायकवाड ,दत्ता कदम ,शंकर कोनापुरे , संतोष वाघमारे, राहुल राऊत व जिल्ह्यातील प्रगतिशील शेतकरी बांधव भगवान इंगोले, गुलाब मंजुषा पावडे, बळवंतराव पोळ, सुनील शिंदे, अमोल सावंत, शंकर इंगोले, मुंगल,हनवते, सर्व कृषी सखी यांची उपस्थिती होती.

# पिक विमा, सरसकट कर्ज माफीसाठी संभाजी ब्रिगेडचे तालुका कृषी अधिकारी कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण

अंबाजोगाई (प्रतिनिधी) सन २०२३ चा प्रधानमंत्री पिक विमा मंजूर करून तो सरसकट देण्यात यावा, शेतकऱ्यांचे सरसकट कर्ज माफ करा, ई-पिक पाहणी अट रद्द करा आणि सन २०२० चा पिक विमा द्यावा या मागण्यांसाठी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रविण उत्तमराव ठोंबरे यांच्या नेतृत्वाखाली मंगळवार, दिनांक २७ ऑगस्ट रोजी तालुका कृषी अधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले. याबाबत संभाजी ब्रिगेडच्या वतीने उपजिल्हाधिकारी, तालुका कृषी अधिकारी यांना यापूर्वी निवेदन देण्यात आले होते. मागील अनेक महिन्यांपासून संभाजी ब्रिगेडने हा विषय लावून धरला आहे. पाठपुरावा सुरू ठेवला




आहे. प्रमुख मागण्यांसाठी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रविण उत्तमराव ठोंबरे यांच्या नेतृत्वाखाली मंगळवार, दिनांक २७ ऑगस्ट रोजी तालुका कृषी अधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले. शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट यांच्या पुढाकाराने सदरील विषयांकीत प्रश्नासंदर्भात उपोषण स्थळी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रविण उत्तमराव ठोंबरे, तालुका कृषी अधिकारी एस.के.ढाकणे, मंडळ कृषी अधिकारी बी.एस. सूर्यवंशी, कृषी सहाय्यक पंडित काकडे आणि पिक विमा कंपनीचे तालुका प्रतिनिधी अनिकेत पोटभरे, रविंद्र सावंत, रमेश गडदे यांच्याशी सकारात्मक चर्चा करण्यात आली. लवकरच राज्याच्या कृषीमंत्र्यांची भेट घेऊन या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी संभाजी ब्रिगेड, शेतकरी संघटना यांचे शिष्टमंडळ तसेच विमा कंपनी आणि कृषि विभाग यांचे अधिकारी यावेळी उपस्थित असतील असे आश्वासन दिल्यानंतर उपोषणाची सांगता झाली. तत्पूर्वी संभाजी ब्रिगेडच्या वतीने उपजिल्हाधिकारी यांना १६ ऑगस्ट रोजी तर तालुका कृषी अधिकारी यांना २० ऑगस्ट रोजी निवेदन दिले आहे. निवेदनातील मागण्या अशा की, १) सन - २०२३ मध्ये सोयाबीनचे १०० टक्के नुकसान झाले आहे. म्हणून शासनाने शेतकऱ्यांना १०० टक्के पिक विमा द्यावा., २) महाराष्ट्रातील शेतकरी यांचे सरसकट कर्ज माफ करावे., ३) सध्या सोयाबीन व कापूस या पिकांना हेक्टरी ५ हजार रूपये अनुदान आले आहे. परंतु, ज्या शेतकऱ्यांनी ई-पिक पाहणी केली नाही. त्या शेतकऱ्यांचे नांव अनुदान यादीत नाही. तरी त्या शेतकऱ्यांकरिता शासनाने ई-पिक पाहणी अट रद्द करावी. तसेच ४) सन २०२० चा पिक विमा द्यावा. आमच्या या मागण्या लवकर नाही मान्य केल्या तर आम्ही संभाजी ब्रिगेडच्या वतीने जिल्हाभर आंदोलन करू याची नोंद घ्यावी असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. निवेदनावर संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष प्रविण ठोंबरे, संभाजी ब्रिगेड महिला आघाडी जिल्हाध्यक्षा अश्विनीताई यादव, तालुकाध्यक्षा सुनंदाताई लोखंडे, संभाजी ब्रिगेड जिल्हा उपाध्यक्ष अरूण पवार, जिल्हा सचिव नारायण मुळे, तालुकाध्यक्ष सिद्राम यादव, शहरसचिव प्रेम कांबळे, कार्यकर्ते अंगद कांबळे, अभिषेक माने, पृथ्वीराज सोनवणे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. संभाजी ब्रिगेडच्या एक दिवसीय लाक्षणिक उपोषणाला शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट, जिल्हाध्यक्ष अनुरथ काशिद, मराठा सेवा संघाचे मा.जिल्हाध्यक्ष रामकिसन मस्के, रामराजे शिंदे, दत्ता साखरे, रोहन कुलकर्णी, सतिश कुंडगिर, केशव टेहरे, परमेश्वर मिसाळ, शिवाजी जगताप, विलास जाधव, बब्रुवान सोळंके, पांडुरंग तट, सुभाष मायकर, गोविंद जामदार, महादेव जामदार, दत्तात्रय मुळे, वशिष्ठ वानखेडे, हनुमंत काळे या तालुक्यातून आलेल्या शेतकऱ्यांनी जाहीर पाठिंबा दर्शविला. यावेळी संभाजी ब्रिगेडच्या विविध आघाड्यांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## रॅगिंग विद्यार्थ्यांचे भविष्य उध्वस्त करु शकते--हनुमंत भोसले

केज । सचिन भालेराव महाविद्यालयीन जीवनात अनेक विद्यार्थी स्वैर वागताना आपल्या खालच्या वर्गातील व आपल्यापेक्षा लहान विद्यार्थ्यांचा विविध प्रकारे मानसिक व शारीरिक छळ करतात. यामुळे अनेक विद्यार्थी मोठ्या विद्यार्थ्यांनी सार्वजनिक ठिकाणी व जाहीरपणे केलेला असा छळ, टिंगल चेष्टा-मस्करी सहन करू शकत नाहीत व परिणामतः आत्महत्या करतात. या बाबी कायद्याने गुन्हा असून यासाठी कायद्यात किमान दोन वर्षांचा कारावास व दहा हजार रुपये दंड अशा शिक्षेचे प्रावधान असून अशा गोष्टीपासून विद्यार्थ्यांनी दूर राहावे असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते केज न्यायालयाअंतर्गत कार्यरत पॅरालीगल वॉलिनटीअर हनुमंत भोसले यांनी केले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड व जिल्हा सत्र न्यायालयाच्या वतीने आयोजित केज येथील




बाबुराव आडसकर महाविद्याल्यात "अँटीरॅगिंग" मार्गदर्शन शिबिरात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य एम जी फावडे हे होते तर विचारपीठावर ऍड एस व्ही मिसळे, पीएलव्ही संजय , भाग्यश्री काकडे, प्रा किर्दत, प्रा डॉ हिरवे यांची उपस्थिती होती. रॅगिंग सारख्या बाब विद्यार्थ्यांमध्ये गुन्हेगारी वृत्ती निर्माण करते. वरच्या वर्गातील विद्यार्थी अहंमभावातून खालच्या वर्गातील विद्यार्थ्यांचा मानसिक व शारीरिक छळ होईल अशी कृत्ये करतात. ज्यामध्ये सार्वजनिक ठिकाणी जाहीररीत्या त्यांना अपमान वाटेल अशी कृत्ये ज्यामध्ये उद्या मारणे, उठबश्या काढणे, अर्ध नग्न होणे, गाणे म्हणणे किंवा इतर लाज वाटेल असे कृत्य करायला सांगतात, त्यांना उद्धेशून टोमणे मारले जातात. त्यांनी मनासारखे तसे न केल्यास त्यांना हाण-मार केली जाते. यामुळे कांही विद्यार्थी अशा गोष्टी सहन न करू शकल्याने जीवन संपवतात. वास्तविक पाहता या बाबी कायद्याने चुकीच्या असल्याने अशा गोष्टी करणाऱ्या विद्यार्थ्यांना कायद्याने दोन वर्षांचा कारावास व दहा हजार रुपये दंड अशी शिक्षा आहे. इतकेच नाही तर असा गुन्हा करणाऱ्या विद्यार्थ्यांस किमान पाच वर्षे किंवा कायमची शिक्षण बंदीची शिक्षा दिली जाऊ शकते. म्हणून विद्यार्थी व पालकांनीही आपली मुले अशा गुन्हेगारीच्या जाळ्यात अडकणार नाहीत याची काळजी घ्यावी असे आवाहनही हनुमंत भोसले यानी केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य एम जी फावडे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन जेष्ठ विधिज्ञ एस व्ही मिसळे यांनी केले. यावेळी विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

## भाजपकडून नवनिर्वाचित खासदार धैर्यशीलदादा पाटील यांची जंगी मिरवणूक

भाजपाकडून राज्यसभेच्या उमेदवारांची यादी जाहीर करताना भाजपाने रायगड जिल्ह्यातील पेण येथील माजी आमदार तसेच भाजप जिल्हाध्यक्ष धैर्यशीलदादा पाटील यांना राज्यसभेची उमेदवारी जाहीर केली. यानंतर खासदारपदाची माळ गळ्यात पडल्याने सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते, पेण तालुक्यात ही भारतीय जनता पार्टीच्या वतीने नवनिर्वाचित खासदार धैर्यशीलदादा पाटील यांची जंगी विजयी मिरवणूक पेण शहर रेलवे स्टेशन येथून भाजप कार्यालय ते पेण नगरपरिषद,डॉ. आंबेडकर स्मारक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक अशी शहरात तसेच खासदार धैर्यशीलदादा पाटील यांच्या स्नेह सागर निवास्थाना पर्यंत काढ्यात आली. या मिरवणुकीत पनवेल भाजप आमदार प्रशांत ठाकूर,आमदार रविंद्र पाटील, युवा नेते व भाजप उपजिल्हाध्यक्ष वैकुंठ पाटील,युवा नेते मंगेश दळवी,सुरेश खैरे, माजी राजिप अध्यक्षा निलिमा पाटील,माजी नगराध्यक्ष प्रीतम पाटील, युवा नेते अनिरुद्ध पाटील,दिनेश शेलार,अनिल खामकर, स्वप्निल म्हात्रे,माजी नगराध्यक्ष प्रीतम पाटील, मिलिंद पाटील,राजन पाटील तसेच सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी उपस्थित राहून जल्लोष केला.

# अधिकाऱ्यांनो दबावतंत्रास बळी पडू नका, मुख्यमंत्री योजनेचा लाभ गोरगरीबाच्या घरात पोहचवा- अनिलदादा जगताप

### मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत ट्रेनी शिक्षकांच्या निवडीसाठी गरजवंत उमेदवारास प्राधान्य द्यावे

बीड, प्रतिनिधी- मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत ग्रामीण भागात प्रती शाळा एक प्रशिक्षणार्थी या प्रमाणे सुयोग्य व पात्र उमेदवारांची कागदपत्रे प्राप्त करून शाळेकरिता एका प्रशिक्षणार्थी ट्रेनी शिक्षकांची निवड करायाची आहे. मात्र संबंधित अधिकारी सरपंच व इतर लोकांच्या दबावाखाली येऊन स्वतःची नातलग संबंधी यांनाच गरज नसताना या योजनेचा फायदा करून देत आहेत. यामुळे तळागाळातील गरजू लोकांची हेळसांड होत असून या योजनेसाठी सर्वोपरी पात्र असलेल्या गोरगरीब कुटुंबातील उमेदवारास लाभ होत नसल्याच्या तक्रारी शिवसेना कार्यलयात आल्या आहेत. महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे साहेब सर्व सामान्य जनतेच्या हितासाठी योजना राबवत आहेत, त्या आमलात आणत आहेत. मात्र काही अधिकारी दबावतंत्रास बळी पडून गोरगरीब आणि गरजू माणसांच्या तोंडातला घास काढून नाते संबंधातील अपात्र उमेदवारास भरवत आहे. त्या सर्व अधिकाऱ्यांना माझे कळकळीचे आवाहन आहे की, त्यांनी कुणाच्याही दबावाखाली न येता मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत ग्रामीण भागात प्रती शाळा एक प्रशिक्षणार्थी या प्रमाणे सुयोग्य व पात्र उमेदवारांची कागदपत्रे प्राप्त करून नियम अटींनुसारच शाळेकरिता एका प्रशिक्षणार्थी ट्रेनी शिक्षकांची निवड करावी. जर आपल्यावर कुणी दबाव टाकत असेल तर याची माहिती आम्हाला द्यावी. मात्र कुणाच्या दबावाखाली येऊन अपात्र



उमेदवाराची निवड करू नये. अन्यथा शिवसैनिकांशी गाठ असेल आणि त्यांना शिवसेना स्टाईलनेच उत्तर देण्यात येईल असे शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी माध्यमांना पत्रक जारी करत अधिकाऱ्यांना सूचना आवाहन करून कडक इशारा दिला आहे.

गरजवंत आणि पात्र उमेदवाराची हेळसांड कदापि सहन करणार नाही- अनिलदादा जगताप

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत ग्रामीण भागात प्रती शाळा एक प्रशिक्षणार्थी या प्रमाणे सुयोग्य व पात्र उमेदवारांची कागदपत्रे प्राप्त करून शाळेकरिता एका प्रशिक्षणार्थी ट्रेनी शिक्षकांची निवड करायाची आहे. मात्र संबंधित अधिकारी सरपंच व इतर लोकांच्या दबावाखाली येऊन स्वतःची नातलग संबंधी यांनाच गरज नसताना या योजनेचा फायदा करून देत आहेत. यामुळे तळागाळातील गरजू लोकांची हेळसांड होत असून या योजनेसाठी सर्वोपरी पात्र असलेल्या गोरगरीब कुटुंबातील उमेदवारास लाभ होत नसल्याच्या तक्रारी शिवसेना कार्यलयात आल्या आहेत. अधिकाऱ्यांनी कुणाच्याच दबावाखाली न येता नियम अटीनुसारच काम करावे आणि मुख्यमंत्री योजनेचा लाभ गोरगरीब गरजवंत पात्र उमेदवारास द्यावा. गरजवंत आणि पात्र उमेदवाराची हेळसांड कदापि सहन करणार नाही असे शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी माध्यमांना जारी केलेल्या पत्रकात म्हंटले आहे.
ooooo

## गायरान जमिनीवरील सौर ऊर्जा प्रकल्प रद्द करण्याच्या मागणीसाठी वीस अतिक्रमण धारकांचा तहसील समोर आत्मदहनाचा प्रयत्न

**केज । सचिन भालेराव**

सरकारी गायराण जमिनीवर मागास प्रवर्गातील भूमिहीनानी अतिक्रमण करून कुटुंबांची उपजीविका करीत असताना सरकारने सौर ऊर्जा प्रकल्पाच्या नावाखाली गायराण जमीन खाजगी विकासकाच्या घशात घालण्याचा केलेल्या प्रयत्नाला विरोध दर्शविण्यासाठी केज तालुक्यातील उमरी येथील गायराधारकांनी रिपाइंच्या बॅनरखाली वीस महिला व पुरुषांनी तहसील कार्यालया समोर अंगावर ज्वलनशील खनिज द्रव्य अंगावर ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला आहे. या बाबतची माहिती अशी की, उमरी ता. केज जि. बीड येथील भूमिहीन गायरानधारक सन १९८० ते १९८१ पासुन उमरी येथील सर्वे नं. ४३ मधील ३० एक्कर गायरान जमीन कसुन उपभोग घेत आहेत. या



गायरान जमीनीच्या अतिक्रमणाची महसुली अभिलेख्याला नोंद आहे. परंतु भूमिहीन कसत असलेल्या गायरान जमीनीवर विद्युत वितरण कंपनीने सौर ऊर्जा विद्युत प्रकल्प उभा करण्याचा डाव आखलेला आहे. त्यामुळे अतिक्रमण धारकांचा संसार मोडून त्यांच्या उपजीविकेचे साधन हिरावले जाणार असल्याने त्यांनी व्यथित होवून त्यांनी या सौर ऊर्जा प्रकलपला विरोध केला असून तो रद्द करण्यात यावा. म्हणून दि. २७ ऑगस्ट दुपारी १:४५ वा. च्या सुमारास तहसील कार्यालय केजच्या प्रवेशद्वारावर रुपचंद ढालमारे, रघुनाथ ढालमारे, सुरेश सोनवणे, नवनाथ सोनवणे, सुंदर सोनवणे, बापुराव ढालमारे, नारायण सोनवणे, माणिक सोनवणे, दत्तू सोनवणे, दिलीप पवार, संतराम सोनवणे, अविनाश दहिरे, रत्नदीप दहिरे, सुनिता पवार, विजयमाला ढालमारे, कमल सोनवणे, कस्तुरबाई ढालमारे, रंजना धीरे, अश्रुबा खरात, रेखा सोनवणे, माणिक सोनवणे यांनी अंगावर ज्वलनशील खनिज द्रव्य ओतून काडी ओढून घेत स्वतःला जाळून घेण्याचा प्रयत्न केला. यावेळी पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक बाळासाहेब रोडे, पोलीस नाईक मतीन शेख यांनी त्यानं रोखले तर रिपाइंचे तालुका अध्यक्ष दिपक कांबळे, मराठवाडा संघटक गोवर्धन वाघमारे, सरचिटणीस पत्रकार गौतम बचुटे आणि दिलीप बनसोडे यांनी कार्यकर्त्यांची समजूत काढून यासाठी सनदशीर मार्गाने आंदोलन करण्याचे करण्याचे सुचविले.

## चालत्या ट्रक मधून एक लाखाच्या कपड्याची चोरी




केज । शेख सज्जाद गुजरात राज्यातून केज मार्गे हैद्राबादकडे जात असताना कोरेगाव पाटी जवळ चालत्या टेम्पो मधून अज्ञात इसमाने ताडपत्री फाडून आतील एक लाख रु. चे तयार कपड्याचे बॉक्स चोरट्याने पळविले आहेत. या बाबतची माहिती अशी की, लातूर जिल्ह्यातील विक्रम कमलाकर कांबळे हे आयशर टेम्पो क्र (एम एच-२४/ए यू-९४४१) दि. २२ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६:०० वा. सुमारास गुजरात राज्यातील वापी येथुन तयार कपड्या बॉक्स भरुन हैद्राबादकडे जात होते. दि. २५ ऑगस्ट रोजी पहाटे ५:०० वा. सुमारास ते व सोबत क्लिनर म्हणून असलेला सतीश देशमाने हे केज मार्गे हैद्राबादकडे जात असतांना कोरेगाव पाटीच्या जवळुन त्यांची गाडी पुढे टोल नाक्याजवळ आली असता. त्या वेळी सकाळी ६:०० वाज च्या सुमारास त्यांच्या पाठी मागुन आलेला एक ट्रक त्यांना ओव्हरटेक करुन जात असतांना त्या ट्रक ड्रायव्हरने सांगीतले की, एक अनोळखी व्यक्ती ट्रक मधील बॉक्स खाली टाकीत आहे. त्या नंतर त्याने गाडी थांबवली तोपर्यंत गाडीतील चोरी करणारा इसम तेथुन पळुन गेला. त्या ट्रक मधील १ लाख रु. चे तयार शर्ट व पँट चे बॉक्स चोरीला गेले आहेत दरम्यान विक्रम कांबळे यांच्या तक्रारी वरून केज पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुद्धगु.र.नं.४५९/२०२४भा.न्या.सं.३०३(२)गुन्हादाखलकरण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरेश बनसोडे हे करीत आहेत.

# ऑगस्टमध्ये अर्ज दाखल केलेल्या लाडक्या बहिणींना पैसे कधी मिळणार?

# अदिती तटकरेंनी दिली महत्त्वाची माहिती



## अदिती तटकरेंनी दिली महत्त्वाची माहिती

राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, “लाडकी बहीण योजनेचा दुसरा राज्यस्तरीय मेळावा नागपूरमध्ये आयोजित करण्यात येणार आहे. हा मेळावा येत्या 31 ऑगस्टला होणार आहे. या माध्यमातून ऑगस्ट महिन्यात अर्ज दाखल केलेल्या महिलांच्या खात्यात जुलै आणि ऑगस्ट महिन्याचे तीन हजार रुपये पाठवण्यात येणार आहेत, अशी माहिती अदिती तटकरे यांनी दिली. ज्या महिलांनी ऑगस्ट महिन्यात अर्ज सादर केले आहेत. त्यांच्या अर्जांची छाननी सुरु आहे. त्यांना 31 ऑगस्टला पैसे मिळतील”, असं अदिती तटकरे म्हणाल्या.

## जुलै महिन्यात 1 कोटी 8 लाख महिला लाभार्थी

राज्य सरकारकडून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या प्रचारासाठी विविध जिल्ह्यात कार्यक्रमांचं आयोजन केलं जात आहे. यातील पहिला राज्यस्तरीय निधी वितरण सोहळा पुण्यात पार पडला होता. त्यानंतर आता दुसरा सोहळा नागपूरमध्ये आयोजित केला जात आहे. ऑगस्ट महिन्यात साधारण 50 लाखांहून अधिक अर्ज आले आहेत. या अर्ज सादर करणाऱ्या महिला अर्जदारांपैकी पात्र ठरलेल्या महिलांच्या खात्यात 3 हजार रुपये दिले जाणार आहे. यापूर्वी जुलै महिन्यात अर्ज सादर करणाऱ्या महिला अर्जदारांपैकी पात्र ठरलेल्या 1 कोटी आठ लाख लाभार्थी महिलांच्या खात्यात तीन हजार रुपये वर्ग करण्यात आले होते.

**केज/प्रतिनिधी**

महाराष्ट्र सरकारने राज्यातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु केली आहे. या योजनेद्वारे महिलांच्या खात्यात दर महिना 1500 रुपये देण्यात येणार आहेत. या योजनेला सर्वसामान्य महिलांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. या योजनेसाठी जुलै महिन्यात अर्ज केलेल्या महिल्यांच्या खात्यात पैसे जमा झाले आहेत. त्यानंतर आता असंख्य महिला ऑगस्टमध्ये अर्ज करणाऱ्या महिलांच्या खात्यात कधी पैसे येणार, अशी विचारणा करत आहे. आता राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी याबद्दल महत्त्वाची माहिती दिली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जुलै महिन्यापासून सुरु झाली. सुरुवातीला या योजनेचे अर्ज भरताना महिलांना असंख्य अडचणींचा सामना करावा लागला. मात्र त्यानंतर सरकारने यात अनेक बदल करत ही प्रक्रिया सोपी-सुटसुटीत बनवली. यानंतर असंख्य महिलांनी जुलै महिन्यात हा अर्ज दाखल केला. या सर्व महिलांना जुलै आणि ऑगस्ट अशा दोन महिन्याचे 3 हजार रुपये रक्षाबंधनापूर्वी मिळाले. यानंतर आता ऑगस्ट महिन्यात अर्ज सादर करणाऱ्या महिलांच्या अर्जांची पडताळणी सुरु करण्यात आली. आता अखेर ऑगस्ट महिन्यात अर्ज केलेल्या महिलांच्या खात्यात पैसे कधी येणार? याची माहिती समोर आली आहे.



ठाणे : दिवा विकास प्रतिष्ठान प्रस्तुत डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे मित्र मंडळाची दिवा शहरातील सर्वात मोठी दहीहंडीचे आयोजन मा. नगरसेवक शैलेश पाटील यांनी केले होते. प्रसंगी अनेक मंडळानी थरावर थर रचून बक्षीसांची लयलूट केली. (फोटो - संतोष पडवळ )

## आपेगावी रंगला माऊलींचा जन्मोत्सव सोहळा


## जन्मोत्सवानिमित्त मंदिरात आकर्षक फुलांची आरास

**पैठण । चैताली औटी**

|तिथी कृष्णाष्टमी श्रावणमासी|
||वर्षा ऋतू युवा मध्यरात्रीशी||
|शके अकराशे सत्त्याणोवाशी|
||आपेगावी क्षेत्री जन्मे ऋषिकेशी||

या प्रमाणे श्री संत ज्ञानेश्वर महाराज तथा भगवान श्रीकृष्ण परमात्माचा जन्मोत्सव एकाच दिवशी साजरा केला जातो. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी संत सम्राट ज्ञानोबारायांचा ७४९ वा जन्मोत्सव जन्मभूमी असलेल्या श्रीक्षेत्र आपेगाव येथे साजरा करण्यात आला.याही वर्षी संत सम्राट ज्ञानेश्वर माऊलींच्या मूर्तीला फुलांची आकर्षक आणि मनमोहक आरास करण्यात आली होती. .

काल अष्टमीच्या दिवशी रात्री १० ते १२ यावेळात श्री ह.भ.प. भानुदास महाराज कोल्हापूरकर (भाऊ)यांचे पुष्पवृष्टी कीर्तन झाले. त्यानंतर रात्री १२वा.माऊलींच्या मूर्तीचा महाअभिषेक करून जन्मोत्सव मोठा भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला.यावेळी फटाक्यांची जोरदार आतषबाजी करण्यात आली होती.हा जन्मोत्सव सोहळा याची देही याची डोळा पाहण्यासाठी आपेगावी भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. जन्मोत्सवानिमित्त मंदिरात सात दिवस विविध धार्मिक कार्यक्रम पहाटे कलशपूजन,४ ते ६ काकडा भजन, सकाळी ६ ते ७ विष्णूसहस्त्रनाम, सकाळी ७ ते१० ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी १० ते ११ बाळक्रीडा गाथाभजन,सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, रात्री ८ ते १० हरीकिर्तन व जागर अशा धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या सप्ताहाची सांगता ३० ऑगस्टला काल्याच्या कीर्तनाने होणार आहे.



## मालेगाव महापालिकेचा भ्रष्टाचार चव्हाट्यावर

**नाशिक । सुरेश इंगळे**

अलीकडेच मालेगाव महापालिका आयुक्तावर एसीबीने कारवाई केली होती. त्यानंतर आता निधी अपहाराचे प्रकरण समोर आले आहे. त्यामुळे महापालिकेतील भ्रष्टाचार चव्हाट्यावर आला आहे. एकूण २० लाख ६८हजार ६०७ रुपयाचा निधीचा अपहार केल्याचा ठपका १५ जणांवर आहे. आजी-माजी अधिकाऱ्यासह १५ जणांवर वीस लाखाच्या निधीचा अपहर केल्याप्रकरणी नाशिकच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुन्हा दाखल केला असल्याने मोठी खळबळ उडाली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक नितीन पाटील यांच्या तक्रारीनंतर हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये महापालिकेचे शहर अभियंता कैलास बच्छाव यांच्यासह पाच निवृत्त अधिकारी, कर्मचारी आणि एक खाजगी व्यक्तीचा समावेश आहे. गुन्हा दाखल झालेल्या १५ जणांनी स्वतःच्या पदाचा व अधिकाराचा गैरवापर करून नेमून दिलेले काम केले नाही. डी वाय शहा फर्मचे ठेकेदार, सोहेल अब्दुल रहमान मासूम अली शहा यांनी केलेल्या विकास कामाचे कोणतेही मूल्यमापन केले नसून जाणीवपूर्वक प्रशासकीय जबाबदारी टाळून संबंधित ठेकेदारास स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी महापालिकेचे वीस लाख ६८,६०७ रुपये अदा करून आर्थिक घोटाळा केल्याचे एसीबीच्या चौकशीत निष्पन्न झाले आहे. त्यामुळे एकूण १५ आजी-माजी अधिकारी कर्मचाऱ्यांवर भ्रष्टाचार प्रतिबंधक १९८८ चे कलम १३१ सह व भादवी कलम ४०९, ४२० ,४६८,४७१,३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्हा दाखल झाल्या पैकी कैलास राजाराम बच्छाव (शहर अभियंता), मुरलीधर हरी देवरे (सध्या निवृत्त तत्कालीन कनिष्ठ अभियंता), संजय जनार्दन जाधव (तत्कालीन कनिष्ठ अभियंता), राजेंद्र काशिनाथ बाविस्कर (सेवानिवृत्त तत्कालीन उपाभियंता), सोयल अब्दुल रहमान, मासूम अली शहा (खाजगी व्यक्ती) ,दिनेश आनंदराव जगताप (विभाग प्रमुख के बी एच पॉलिटेक्निकल मालेगाव), निलेश हिरामण जाधव (तत्कालीन कनिष्ठ लिपिक), अशोक ओंकार मसदे (तत्कालीन लेखापरीक्षक सेवानिवृत्त), सुहास वसंत मसदे (तत्कालीन लेखापरीक्षक सेवानिवृत्त), सुहास वसंत कुलकर्णी (तत्कालीन कनिष्ठ लिपिक), माकरुद्दीन शमशुद्दीन शेख (तत्कालीन लेखा अधिकारी सेवानिवृत्त), सुनील दत्तात्रय खडके (तत्कालीन कनिष्ठ लिपिक), मधुकर अशोक चौधरी (कनिष्ठ लिपिक सेवानिवृत्त), उत्तम माधवराव कावळे (मुख्य लेखापरीक्षा सेवानिवृत्त) केदा रामदास भामरे (कनिष्ठ लिपिक), कृष्णा वळवी (मृत तत्कालीन उपायुक्त) त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस प्रशासन करत आहे.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077